# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या प्रगतीच्या अनुषंगाने दि.०८/०९/२०२३ रोजी मा. प्रधान सचिव सो.(२), नगरविकास विभाग, मंत्रालय यांचे दालनात झालेल्या बैठकीत, प्रकल्पाच्या उर्वरीत कामाची चालु दरानुसार किंमत व मंजुर निविदा दरानुसार उर्वरित कामाची भाववाढसह किंमत यातील तफावती बाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना जा.क्र./भिनिशमनपा/पापुवि/५१३/२०२३, दि.१५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाच्या उर्वरीत कामाची चालु दरानुसार किंमत व मंजुर निविदा दरानुसार उर्वरित कामाची भाववाढसह किंमत यातील तफावती बाबत अहवाल सादर करण्याचे कळविले होते. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संदर्भ क्र.३ अन्वये भिवंडी मनपास पत्रान्वये तफावती बाबत कळविले असून त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदा दराने | चालु दरसुचिनुसार |
|---|---|---|---|
| १ | निविदेतील उर्वरित कामाची स्विकृत निविदा दराने किंमत | रु.५८,२३,८४,५६०.५८/- | रु.६७,७६,८२,६४९.९०/- |
| २ | निविदा दरावर ८.९% वस्तु व सेवाकर आणि चालु दरसुचीवर १८% वस्तु व सेवा कर | रु.५,१८,३२,२२५.८९/- | रु.१२,१९,८२,८७६.९८/- |
| ३ | अतिरिक्त बाबांची किंमत | रु.९८,१३,५६४/- | |
| ४ | उर्वरित कामावरील भाववाढ | रु.११,६१,२४,४१५.५३/- | |
| ५ | एकूण | रु.७६,०१,५४,७६६/- | रु.७९,९६,६५,५२६.८८/- |
| ६ | फरक | रु.३,९५,१०,७६१/- | |

सदर उर्वरित काम चालु दरसुचीनुसार केल्यास रु. ७९.९७ कोटी खर्च अपेक्षित असून, सदर ठेकेदाराकडून निविदा दराने उर्वरित काम करुन घेतल्यास या उर्वरित कामावर भाववाढ दिल्यास रु. ७६.०१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सबब त्यामुळे सुमारे रु. ३.९५ कोटी इतकी बचत होणार असल्या बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कळविले आहे. सदर प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.०९/०२/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदर कामी मा. प्रधान सचिव सो. (२), नगरविकास विभाग, मंत्रालय यांना सदर बाबत जा.क्र./भिनिशमनपा/पापुवि/१५७/२०२४, दि.०९/०२/२०२४ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी

निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४३९ **दिनांक :** ०९/०७/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या ठरावास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- नगरोत्थान अभियान भिवंडी निजामपूर भुयारी गटार योजना टप्पा-२ मधील अतिरीक्त बाब क्र. १ प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ या प्रकल्पाचे संदर्भिय कार्यादेशान्वये काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाच्या मुळ प्रस्तावात पंपींग स्टेशन व मलशुद्धीकरण केंद्र ही एकाच ठिकाणी असल्याने Rising Main वाहिनी व आवश्यक Specials या बाबीं अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या नाहीत. सदरचे काम सुरु असताना पंपींग स्टेशन व मलशुद्धीकरण केंद्रांची ठिकाणामध्ये बदल झालेल्याने तसेच स्विकृत निविदेमध्ये D.I. Specials चा अंतर्भाव नसल्याने प्रकल्पाचे काम करण्यास अडचण होत होती. त्यामुळे सदर कामी अतिरिक्त बाबींस मंजुरी मिळणे कामी सदर कामाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना संदर्भ क्र. २ अन्वये फेर सादर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार उद्भवलेल्या अतिरिक्त बाब क्र. १ रक्कम रु.९८,६३,३१०/- मात्रच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी खालील प्रमाणे अटींच्या अधिन राहुन तांत्रिक सहमती दिलेली आहे.

१. योजनेच्या प्रशासकीय तसेच तांत्रिक मंजुरीतील अटींचे पाल करण्यात यावे.
२. योजनेवर मंजुर किंमतीपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.
३. प्राप्त निधीनुसार कामे हाती घेण्यात यावीत.
४. सदर अतिरिक्त बाबींच्या प्रस्तावास केवळ तांत्रिक सहमती देण्यात येत आहे. सदर अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या मंजुरीबाबत आवश्यक कार्यवाही भिवंडी निजामपूर शहर महानरपालिकेने त्यांच्या स्तरावर करावी.
५. अतिरिक्त बाबींकरीता प्रस्तावित करण्यात आलेले दर योग्य असल्याची खातरजमा अधिक्षक अभियंता यांनी करावी.
६. अतिरिक्त बाबींकरीता प्रस्तावित केलेली परिमाणे योग्य असल्याची खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी करावी.
७. सदर अतिरिक्त बाबींच्या अनुषंगाने आवश्यक स्पेसिफिकेशन ठेकेदारास उपलब्ध करुन देण्यात यावेत.
८. अतिरिक्त बाब प्रस्ताव मान्य असल्याबाबत ठेकेदाराची प्रस्तावावर स्वाक्षरी घेण्यात यावी.
९. योजनेवर होणाऱ्या बचतीबाबत खातरजमा करण्यात यावी.

सदर तांत्रिक मंजुरी मधील अट क्र. २ अन्वये भुयारी गटार योजना टप्पा-२ या योजनेवर मंजुर किंमतीपेक्षा जास्त खर्च न करण्याबाबत नमुद आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे रक्कम रु. ३७६ कोटी मात्रचे काम पुर्ण झालेले असुन प्रकल्पाची आर्थिक प्रगती ९४ % व भौतिक प्रगती ९५.५% झालेली असुन अतिरिक्त बाबींसाठीचा खर्च मंजुर प्रकल्प रक्कम रु.४२७.९८ कोटीच्या मर्यादेच्या अधिन राहुन करणे आवश्यक आहे. तसेच बाब क्र.४ नुसार सदर अतिरिक्त बाब प्रस्तावाच्या मंजुरी बाबत आवश्यक कार्यवाही भिवंडी नि. श. महानगरपालिका स्तरावर करण्याबाबत कळविलेले आहे. बाब क्र. ८ अन्वये अतिरिक्त बाब मान्य असल्याबाबत ठेकेदाराची प्रस्तावावर स्वाक्षरी घेण्याबाबत नमुद असुन सोबत जोडलेल्या अतिरिक्त बाब प्रस्तावावर ठेकेदार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

तरी भुयारी गटार योजना टप्पा-२ योजने कामी मंजुर प्रकल्प रक्कम रु.४२७.९८ कोटीच्या मर्यादेच्या अधिन राहुन उद्भवलेली अतिरिक्त बाब क्र. १ साठी रक्कम रु.९८,६३,३१०/- मात्रचे अंदाजपत्रक दरसुची २०२१-२२ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ मधील अतिरीक्त बाब क्र. १ बाबतच्या प्रशासकिय ठरावास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४४० **दिनांक :** ०९ /०७/ २०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ मधील अतिरीक्त बाब क्र. १ बाबतच्या ₹९८,६३,३१०/- मात्र प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ मधील अतिरीक्त बाब क्र. १ बाबतच्या ₹९८,६३,३१०/- मात्रच्या प्रस्तावाच्या ठरावास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:-** **प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामाकरीता तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकरीता मजूर सेवा पुरविणे कामी रु.१,०१,६२,४८३/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र.९९१/ २०२३, दि. २१/०६/२०२३ अन्वये कार्यादेशानुसार मे. बरकत कॉन्ट्रक्टर्स यांचे नावे काम मंजूर झालेले आहे. सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्तीकरीता मजुर सेवा पुरविणेकामी रु.१,०७,८१,६२१/- मात्र खर्च अपेक्षित असुन मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव क्र.३९९, दि.०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा क्र.६६/२०२३-२४ दिनांक ०७/०३/२०२४ ते दि.२१/०३/२०२४ या कालावधीत पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि. २६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ करीता आदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत असल्याने तसेच ई निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यता, प्रशासकीय ठराव घेऊन कार्यादेश देणेकरीता माहे जून २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

तरी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून माहे एप्रिल, मे व जुन २०२४ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे.बरकत कंन्ट्रक्शन यांचे निविदेतील **दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी** असल्याने **दि.०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४** रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता **रु.२५,२७,९१८/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता पहिल्या मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामाकरीता पहिल्या मुदतवाढ करीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.** | **रु.२५,२७,९१८/-** |

सदर कामाकरीता दिनांक ०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४ पर्यंत ३ महिन्याच्या मुदतवाढीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे सन २०२३-२०२४ मधील निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** 889 **दिनांक** ९/10/२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**

**प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका,भिवंडी.

**विषय:-** स्टेम प्राधिकरणाच्या अस्तित्वातील योजनेचे नुतनीकरण / विस्तारीकरण करण्याच्या कामासाठी निधी उपलब्धतेसाठी योजना राज्य शासनाच्या सुवर्णजंयती नगरोत्थान महाअभियानां र्गत सादर करणेस भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची मान्यता मिळणेबाबत.
design & construction new pump house at shahad Head works with electromechanical work and providing laying and commissioning of new 1850 dia MS pipeline from shahad to WTP Temghar and MS.pipe line from WIP Temghar to Mankoli MBR for additional water lifting scheme

**कार्यालयीन प्रस्तावना:-**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडून भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा स्टेम प्राधिकरणातील हिश्यानुसार पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर पाणीपुरवठा करणारी स्टेम प्राधिकरणाची जलवाहिनी जिर्ण झाली असुन पाणी पुरवठा सुरळीत राखण्याच्या दृष्टिकोनातून जलवाहिनीचे मजबुतीकरण व नुतनीकरण करणे तसेच शहाड येथील जलउदनचंन केंद्राचे नुतनीकरण करणे व अनुषंगीक कामे "Design and construction new Pump house at Shahad Head works with electromechanical work and Providing laying and commissioning of new 1850 dia M.S. Pipe line from Shahad to WTP. Temghar and M.S. Pipeline from WTP. Temghar to Mankoli MBR for additional water lifting scheme" या कामाच्या रु.261.50 कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.

सदरची योजना राबविण्यासाठी स्टेम प्राधिकरणाकडे निधीची कमतरता असल्याने सदरची योजना राज्य शासनाच्या मंजुरीसाठी स्टेम प्राधिकरण सर्व हिस्सेधारकांच्या वतीने सादर करणार आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नगरोत्थान महाअभियान अभियानांची राज्यात अंबलबजावणी करण्यासंदर्भांत शासन निर्णय क्रमांक— नगरो-२०२३/प्र.क्र.३८९/नवि-३३ दि.२२/०२/२०२४ अन्वये निर्गमित करण्यांत आलेला आहे. सदरबाबत स्टेमच्या भागधारकांनी त्यांच्या संस्थेच्या प्रशासकीय ठरावास मंजुरी देऊन सादर करणेबाबत बोर्ड मिटींग ४४ दि.२५/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयास अनुसरुन स्टेम प्राधिकरणाने मा.प्रधानसचिव,नगर विकास-२,महाराष्ट्र शासन यांचेशी पत्रव्यवहार केलेला असलेबाबत भिवंडी नि.शहर महानगरपालिकेस अवगत केले आहे. तसेच योजनेबाबत खालील बाबी निदर्शनास आणण्यात आलेल्या आहेत.

1. स्टेम मार्फत प्रस्तावीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमधील सुधारणा करणेच्या कामी **रु.266.35** कोटी पैकी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भागभांडवल (14.68) प्रतिशत प्रमाणनुसार रु.39.09 कोटी प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता मिळणे.

2. प्रकल्प स्टेम कंपनीमार्फत राबवण्यात येणार असल्याने स्टेमच्या अर्थसंकल्पात"नगरोत्थान महाअभियान योजना पाणी पुरवठा प्रकल्प" हे स्वतंत्र लेखाशिर्षक तयार करणे.

3. प्रस्तावास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत निधी प्राप्त होणार असल्याने या योजनेतील आकृतीबंधाप्रमाणे 30% स्वहिश्याचा निधी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या वतीने स्टेम कंपनीने करावयाचा आहे.

4. या प्रकल्पापोटी येणाऱ्या खर्चाचे दायित्व स्टेम कंपनीचे असेल.

5. प्रकल्पास समितीने मंजुरी दिलेल्या प्रकल्प किंमतीत अतिरिक्त कामांमुळे अथवा प्रकल्प अंमल बजावणीत झालेल्या विलंबामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांमुळे वाढ झाल्यास सदर वाढीव खर्च स्टेम कंपनीने करावयाचा आहे.

6. सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीचा सर्व खर्च स्टेमच्या स्वनिधीतून करण्यात यावा.

सदर कामास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** ३१२ **दिनांक** ०९/०७/२०२४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषतः कलम 452(अ) च्या (१ अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस स्टेम प्राधिकरणाकडुन भिवंडी नि.श.महानगरपालिकेच्या हिश्यानुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी जीर्ण असून पाणीपुरवठा सुरळीत राखण्याच्या दृष्टीकोणातून जलवाहिनीचे मजबुतीकरण व नुतनीकरण करण्याचा design & construction new Pump house at Shahad Head Works with electromechanical work and Providing laying and commissioning of new 1850 dia M S Pipeline from to Shahad WTP. Ten ghar and M.S.Pipe line from WTP Temghar to Mankoli MBR for additional water lifting Scheme रु.261.50 कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त आहे. स्टेम प्राधिकरणा मार्फत सदर प्रकल्प राबविणे प्रस्तावित असून त्या करीता आवश्यक निधी हा राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियाना अंतर्गत उपलब्ध होणे बाबत स्टेम प्राधिकरणाने मा. प्रधानसचिव, नगरविकास-२. महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात येणार आहे. व तसे भिवंडी महानगरपालिकेस अवगत केले आहे. तसेच सदर योजनेसाठी आवश्यक स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वहिश्याचा प्राधिकरनामार्फत उपलब्ध करण्यात येणार आहे.

स्टेम प्राधिकरणा मार्फत प्रस्तावित प्रकल्पाने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिके करीता होत असलेल्या पाणीपुरवठा व्यवस्थेचे मजबूतीकरण होणार आहे तसेच स्टेम प्राधिकरणामध्ये भिवंडी महानगरपालिकेची असलेली भागीदारी आहे. यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषतः कलम 452 अ) च्या (१ अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन

आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर प्रस्तावानुसार विषयांकीत काम स्टेम प्राधिकरणांमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावनेतील नमुद 1 ते 6 बाबीनुसार तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती नुसार राबविण्यास भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची सहमती आहे. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. श.महानगरपलिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामाकरीता तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणे कामी रु.१,२१,०१,८४९/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र.९९०/ २०२३, दि. २१/०६/२०२३ अन्वये कार्यादेशानुसार मे. बरकत कॉन्ट्रक्टर्स यांचे नावे काम मंजूर झालेले आहे. सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी मजुर सेवा पुरविणेकामी रु.१,२८,६५,५३६/- मात्र खर्च अपेक्षित असुन मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव क्र.३९९, दि.०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा क्र.६६/२०२३-२४ दिनांक ०७/०३/२०२४ ते दि.२१/०३/२०२४ या कालावधीत पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि. २६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ करीता आदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत असल्याने तसेच ई निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यता,प्रशासकीय ठराव घेऊन कार्यादेश देणेकरीता माहे जून २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

तरी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून माहे एप्रिल, मे व जुन २०२४ करीता सन २०२३-२४ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे.बरकत कॉन्ट्राक्टर यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने **दि.०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४** रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता **रु.३०,२५,४६२/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता पहिल्या मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामाकरीता पहिल्या मुदतवाढ करीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.** | **रु.३०,२५,४६२/-** |

सदर कामाकरीता दिनांक ०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४ पर्यंत ३ महिन्याच्या मुदतवाढीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे सन २०२३-२०२४ मधील निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ४४३ **दिनांक** ९/१० /२०२४

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणेच्या कामास तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:-** **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामाकरीता तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी रु.२,४४,०२,१८६/- मात्रची ई निविदा भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र. ९९२ दिनांक २१/०६/२०२३ अन्वये कार्यादेशानुसार मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे नावे मंजूर झालेली आहे. सदर निविदेची मुदत दि. ३१/०३/२०२४ रोजी संपलेली आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षा करीता प्रभाग समिती कृर. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी रु.२,७०,९६,५१५/- मात्र खर्च अपेक्षित असून मजूर सेवा पुरविणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ई निविदा प्रसिध्द करणेकामी ठराव ४०१ दिनांक ०७/०३/२०२४ नुसार प्रशासकीय ठराव घेण्यात आला असून ई निविदा दिनांक ६३/२०२३-२४ दि. ०७/०३/२०२४ ते २१ / ०३/२०२४ या कालवधी पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली असून दि.२६/०३/२०२४ रोजी सदर निविदेतील टेक्नीकल बिड ओपन करुन कागदपत्रांची छाननी करणेत आलेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता अदर्श अचारसंहिता जुन २०२४ पर्यंत असल्याने तसेच ई-निविदेतील प्राईज बिड ओपन करुन निविदेतील दरांना मान्यता, प्रशासकीय ठराव घेऊन कार्यादेश देणेकरीता माहे जुन २०२४ अखेर पर्यंत कालावधी लागणार आहे.

तरी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता प्रगतीपथावरील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु. ६६० लक्ष तरतुद करण्यात आलेली असून माहे एप्रिल, मे व जुन २०२४ या तीन महिन्यांचे देयक सन २०२४-२०२५ तरतुदी मधून अदा करण्यात येईल. तरी सन २०२३-२०२४ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे.बरकत कॉन्ट्राक्टर यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने **दि.०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४** रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता **रु.६०,७०,०४४/-** मात्र खर्च होणार आहे. सदर कामाकरीता पहिल्या मुदतवाढीस आर्थीक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामाकरीता तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.** | **रु.६०,७०,०४४/-** |

सदर कामाकरीता दिनांक ०१/०४/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४ पर्यंत ३ महिन्याच्या मुदतवाढीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता मे. बरकत कॉन्ट्राक्टर यांचे सन २०२३-२०२४ मधील निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** ८८४ **दिनांक** ९ /७ **/२०२४**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास पहिली मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या कामास तीन महिन्याच्या पहिल्या मुदतवाढीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)

**प्रशासक तथा आयुक्त**

o/c

**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत, वॉर्ड क्रं.४बाला कंपाउंड मनपा शाळा क्रं.८६ या शाळेची (आदर्श शाळा अंतर्गत) दुरुस्ती करणेबाबत.**

उपरोक्त विषयांकीत कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२९,६२,८१७/- मात्रची ई निविदा सुचना क्रं.१२४/२०२३-२४ टेंडर क्रं.९६९५०० महाटेंडर संकेतस्थळावर दि.०८/१२/२०२३ ते १५/१२/२०२३ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली. टेक्नीकल बिड दि.२०/१२/२०२३ रोजी उघडण्यात आली असता उक्त कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. छाननी अंती निविदा समितीने २ निविदा पात्र ठरविण्यात आल्या असुन कागदपत्र अपुर्ण असल्याने एक निविदा अपात्र ठरविण्यात आली. उक्त कामाची प्राईज बिड दि.०३/०१/२०२४ रोजी उघडण्यात आली असुन त्याचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | हिमालय मनोहर पाटील. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ टक्के कमी दराने | २५,१८,६९०.०० |
| २ | बुबेरे ॲण्ड असो, भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी दराने | ९,९९,१४८.०० |

हिमालय मनोहर पाटील यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९० टक्के कमी दराने प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दिनांक :-१४ जानेवारी,२०१९ अन्वये पॅरा ४.६.३ नुसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर अतिरीक्त इसारा रक्कम (Additional Performance Security Deposit), बँकेची प्रतिपूती हमी DD सादर करणे अनिवार्य राहील. सदर कामात ठेकेदार यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९० टक्के कमी दराने असल्याने ठेकेदार यांनी बँकेची प्रतिपूती हमी DD सादर करणे अपेक्षित होते मात्र ते सादर केल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयातील पॅरा ५.१.१ नुसार कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात येवुन L-२ निविदाकार यांना वाटाघाटी साठी बोलावणे कामी प्रस्ताव मा.आयुक्त सो यांजकडे मंजुरीसाठी सादर केला असुन त्यास मंजुरी मिळाली आहे. दि.१५/०३/२०२४ रोजी मा.शहर अभियंता यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटी अंती बुबेरे ॲण्ड असो, भिवंडी यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के कमी दराने रक्कम रुपये २५,१८,३९४/-(रुपये पंचवीस लाख अठरा हजार तिनशे चौ-यांनवद) काम करण्यास संमती दर्शविली असुन तसे लेखी पत्र या कार्यालयास सादर केले आहे. व सदर निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** ४४५ **दिनांक :-** ०९ / ०८ /२०२४

बुबेरे ॲण्ड असो, भिवंडी, यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के कमी दराने रुपये २५,१८,३९४/-( रुपये पंचवीस लाख अठरा हजार तिनशे चौ-यांनवद) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत, वॉर्ड क्रं.४ बाला कंपाउंड मनपा शाळा क्रं.८६ या शाळेची (आदर्श शाळा अंतर्गत) दुरुस्ती करणेबाबत याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार बुबेरे ॲण्ड असो, भिवंडी, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

O/C

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे वऱ्हाळा तलाव येथून ५.० द.ल.लि. क्षमतेचे वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्र येथे कच्च्या पिण्याच्या पाण्यावर शुद्धीकरणाच्या प्रक्रियेसाठी ॲलम व ब्लिचिंग पावडरद्वारे जलशुद्धीकरण प्रक्रिया करुन भिवंडी शहराला शुद्ध पाणी पुरवठा केला जातो.

भिवंडी शहरातील नागरीकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करण्यांत येत आहे. भिवंडी शहरातील नागरीकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे करीता वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर खरेदी करावी लागणार आहे. सन २०२४-२५ या वर्षाकरीता एका दिवसाला ३०० किलो ॲलम X ३६५ दिवस = १०९५०० किलो इतका ॲलम लागणार आहे व ब्लिचिंग पावडर एका दिवसाला ३० किलो X ३६५ दिवस = १०९५० किलो इतकी ब्लिचिंग पावडर लागणार आहे. तसेच काटई येथील मल:शुद्धीकरण केंद्राकरीता ब्लिचिंग पावडर एका दिवसाला ५० किलो X ३६५ दिवस = १८२५० किलो तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल मध्ये द्रावण करुन टाकणे करीता प्रत्येक प्रभागाकरीता अंदाजे २०० किलो वार्षिक या प्रमाणे १००० किलो ब्लिचिंग पावडर अशी एकुण ३०२०० किलो ब्लिचिंग पावडर लागणार आहे.

त्याकरीता खुल्याबाजारातुन दर प्राप्त करुन प्राप्त किमान दरांपैकी ब्लिचींग पावडर प्रति किलो ₹६४/- व फस्ट ग्रेड ॲलम प्रति किलो ₹१९/- याप्रमाणे सर्वांत कमी दराचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹४०,१३,३००/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.४०,१३,३००/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत प्रस्तावाच्या (बारा महिन्यांकरीता) प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणे** कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४४६ **दिनांक :** ०८/०७ **/ २०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील **सन** २०२४-२०२५ **या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत** (बारा **महिन्यांकरीता**) ₹४०,१३,३००/- **मात्र प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा** प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील **सन** २०२४-२०२५ **या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या वऱ्हाळादेवी जलशुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचींग पावडर व काटई खोणी मल:शुद्धीकरण केंद्राकरीता फस्ट ग्रेड ब्लिचींग पावडर पुरविणे बाबत (बारा महिन्यांकरीता)** ₹४०,१३,३००/- **मात्रच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक** मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**